याद्वारे मे. सूर्यनगरी रिॲल्टी एलएलपी [पूर्वी मे. झेनिथ एंटरप्रायझेस] यांच्या खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीच्या [''सदर मिळकत''] मालकीहक्काची चौकशी व प्रमाणित करण्यात येत असल्याची सूचना देण्यात येते. सदर मिळकत किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत गहाण, भेट, विक्री, हस्तांतरण, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, अभिहस्तांतरण, परवाना, भाडेदारी, उप-भाडेदारी, वारसा, करारबंध, धारणाधिकार, भार, न्यास, देखभाल, सुखाधिकार, कब्जा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हिस्सा, हक्क, मालकीहक्क, हितसंबंध, मागणी किंवा दावा असल्याचा दावा करणाऱ्या किंवा असा हक्क असलेल्या सर्व व्यक्तींनी, त्यासंबंधीच्या कागदोपत्री पुराव्यासह अधोहस्ताक्षरी यांना त्यांच्या:- प्लॉट क्र. ४१७, विश्वविनीत, डी. के. सांडू मार्ग, चेंबूर, मुंबई ४०००७१ येथील कार्यालयात आणि ई-मेलद्वारे amoltembe@gmail.com वर, या सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, अशा दाव्याचा संदर्भ न घेता मालकीहक्क प्रमाणित करण्यात येईल आणि असा दावा, असल्यास, त्याग केलेला मानला जाईल.

वर संदर्भित परिशिष्ट

सर्व तो जमिनीचा भाग किंवा तुकडा, क्षेत्रफळ ५,१२३.४० चौरस मीटर, सीटीएस क्र. ४१७, ४१७/१ ते ३, गाव देवनार, जो लाला जमनादास गुप्ता मार्ग, देवनार फार्म रोड, देवनार, मुंबई-४०००८८, बृहन्मुंबई येथे स्थित असून, मुंबई उपनगर नोंदणी जिल्हा व उपजिल्ह्याच्या हद्दीत आहे आणि सदर जमिनीच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत:-

उत्तरेस : गाव देवनार येथील सीटीएस क्र. ४१६, ४१६/४ आणि ४१६/५ असलेली जमीन;
दक्षिणेस : नाला आणि लाला जमनादास गुप्ता मार्ग;
पूर्वेस : लाला जमनादास गुप्ता मार्ग; आणि
पश्चिमेस : नाला;

मुंबई, दिनांक ११ ऑगस्ट २०२६

अमोल के. टेंबे
वकिल, उच्च न्यायालय

जाहीर सूचना

सर्व जनतेस ह्या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की खालील परिशिष्टात सविस्तर नमूद केलेली स्थावर मिळकत माझे अशील श्री. ललित राम गवस ह्यांनी श्री. रामदास संभाजी काळे ह्यांच्याकडून कायमस्वरूपी खरेदी खताने विकत घ्यायचे असून कोणत्याही व्यक्तीस अथवा व्यक्तींना किंवा लिखित परीशिष्टात सविस्तरपणे वर्णन केलेली स्थावर मालमत्ता / मिळकती संबंधित किंवा वर किंवा मध्ये कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, आणि मागणी असल्यास, वारसा, बक्षीस, इच्छापत्र एकत्रित प्रभार, गहाण, विक्री, भाडेपट्टा, कब्जा, कूळ आदी व अन्य प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यानी त्याची लेखी हरकत पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कळवावे अन्यथा, असे समजण्यात येईल की, कोणतेही व्यक्ती किंवा व्यक्तीचे दावा अस्तित्वात नाहीत किंवा सदर स्थावर मिळकतीच्या संबंधित कोणताही असा दावा, मालकी हक्क, आणि हितसंबंध सोडून दिल्याचे तसेच नसल्याचे गृहीत धरून खरेदीखत करून व्यवहार पूर्ण केला जाईल, ह्याची नोंद घ्यावी.

वर उल्लेखित परिशिष्ठ

गांव मौजे चवसार, ता. मावळ, जि. पुणे मे. दुय्यम निबंधक मावळ हयांचे हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत

खाता क्र.	गट क्रं.	हिस्सा नंबर	क्षेत्र हे. आर	पोटखराबा	आकार
९०५	३३९	०-००-००	०-५७-००	०-०५-००	०.२२
			पैकी ०-११-३०	०-००-००	०.०४

सही/-
सुशांत बळवंत पाटील, वकील
शॉप नं १, वर्षा पॅलेस कोऑसोलि
काशी नगर, गोडदेव गाव,
भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे ४०१ १०५

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India

भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking

प्रादेशिक कार्यालय, मुंबई (दक्षिण) : युनियन बँक बिल्डिंग, ६ वा मजला, ६६/८०, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

ई-लिलाव विक्री सूचना (सरफैसी ॲक्ट अन्वये)

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) /नियम ९(१)च्या तरतुदींन्वये स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता १५ दिवसांची ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदारांना सूचना देण्यात येते की, खालील वर्णिलेल्या स्थावर मिळकती या तारण धनकोंकडे गहाण/प्रभारीत आहे, ज्यांचा कब्जा युनियन बँक ऑफ इंडिया (तारण धनको) च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, त्या खालील नमुद नुसार संबंधित कर्जदार आणि हमीदार यांचेकडून **युनियन बँक ऑफ इंडिया** (तारण धनको) ला थकीत संबंधित रकमेच्या वसुलीसाठी दिनांक **२७.०८.२०२६ रोजी दु. १२.०० ते सायं. ०५.००** दरम्यान **''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे,'' जे काही आहे तेथे आहे'' आणि ''विना अबलंब तत्त्वाने''** विकण्यात येणार आहेत. राखीव किंमत आणि इसारा अनामत रक्कम खाली नमूद नुसार राहिल. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी कृपया **युनियन बँक ऑफ इंडिया** (तारण धनको) यांची वेबसाईट म्हणजेच **https://www.unionbankofindia.bank.in/auction-property/view-auction-property** मध्ये पुरवलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा. बोलीदार वेबसाईट **https://baanknet.com** येथे देखील भेट देऊ शकतात. खालील नमूद मिळकती या संबंधित कर्ज खात्यामधील संबंधित रक्कम अधिक व्याज आणि इतर खर्चाच्या वसुलीसाठी **२७.०८.२०२६** रोजी वेबसाईट **https://baanknet.com** मार्फत ऑनलाईन ई-लिलाव द्वारे विकण्यात येणार आहेत.

वेबसाईट: http://baanknet.com मार्फत ऑनलाईन ई-लिलाव
लिलावाची तारीख व वेळ: २७.०८.२०२६ रोजी दु. १२.०० ते सायं. ०५.००

संच क्र.	ए) कर्जदारांचे नाव बी) शाखेचे नाव सी) मिळकतीचे वर्णन डी) मालकाचे नाव	ए) राखीव किंमत रुपयात बी) इसारा अनामत रक्कम (इअर) रुपयात	थकीत कर्ज संपर्क व्यक्ती आणि मोबाईल क्र.	भार कब्जा: सांकेतिक/ प्रत्यक्ष
१	**ए) श्री. अधिक रामचंद्र देसाई आणि श्रीमती निताबाई अधिक देसाई** **बी) डंकन रोड शाखा** **सी)** निवासी फ्लॅट, बिल्टअप क्षेत्र ३५५ चौ. फूट आणि धारक फ्लॅट क्र. ८, तळमजला, विंग बी, श्री साईबाबा को-ऑप हाऊसिंग सोसायटी, जुना मातोश्री स्कूलजवळ, सुनीता कॉलनी, विजय नगर, गाव- तिसगाव, कल्याण पूर्व, जिल्हा: ठाणे-४२१३०६. **डी) श्री. अधिक रामचंद्र देसाई आणि सौ. निताबाई अधिक देसाई**	**ए) रु ११,०१,६००.००** **बी) रु १,१०,१६०.००**	**रु. १५,६६,१४९.९८** (रुपये पंधरा लाख सहासष्ट हजार एकशे एकोणपन्नास आणि पैसे अठ्ठ्याण्णव फक्त) दिनांक ३१.०१.२०२३ रोजीस अधिक ०१.०२.२०२३ पासून तारखेपर्यंत त्यावरील लागू व्याजदराने पुढील व्याज, परिव्यय आणि प्रभार. **श्री. अभिषेक तिवारी - मोबा. क्र. ९७१७०८०६९५**	**माहित नाही सांकेतिक कब्जा**
२	**ए) श्री. मोहम्मद जमील कुरेशी आणि सौ. रुखसाना कुरेशी** **बी) मुंबई-कुलाबा शाखा** **सी)** निवासी फ्लॅट क्र. २०२, २रा मजला, बिल्डिंग क्र.-२, एन.जी. व्ह्यू को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, गीता नगर फेज I, हायड्री चौक जवळ, मीरा भाईंदर रोड, मीरा रोड (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र-४०११०७. **डी) श्री. मोहम्मद जमील कुरेशी आणि सौ. रुखसाना कुरेशी**	**ए) रु ३३,०१,०००.००** **बी) रु ३,३०,१००.००**	**रु. ६,७७,५११.७३** (रुपये सहा लाख सत्याहत्तर हजार पाचशे अकरा आणि पैसे त्र्याहत्तर फक्त) दिनांक ३१.०१.२०२६ रोजीस अधिक ०१.०२.२०२६ पासून तारखेपर्यंत त्यावरील लागू व्याजदराने पुढील व्याज, परिव्यय आणि प्रभार. **श्री. अजित प्रसाद - मोबा. क्र. ७६५१९८३७५९** **श्री. सिद्धार्थ कुशवाहा - मोबा. क्र. ९५९४९०९४५४**	**माहित नाही सांकेतिक कब्जा**
३	**ए) सौ. हुसैना खातून सय्यद शफी** **बी) दादर पश्चिम (३१६७०) शाखा** **सी)** निवासी फ्लॅट क्र. १०३, १ला मजला, एस पी आशापुरा अपार्टमेंट, मामदापूर, नेरळ कर्जत, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र-४१०१०१. उत्तर: खुला प्लॉट, दक्षिण: झैनब हाइट्स बिल्डिंग, पूर्व: मामदापूर नेरळ रोड, पश्चिम: झेहरा हाईट्स बिल्डिंग्स **डी) सौ. हुसैना खातून सय्यद शफी**	**ए) रु २६,१०,०००.००** **बी) रु २,६१,०००.००**	**रु. २६,६५,०८१.९५** (रुपये सव्वीस लाख पासष्ट हजार एक्याऐंशी आणि पैसे पंच्याण्णव फक्त) दिनांक ३१.०३.२०२६ रोजीस अधिक तारखेपर्यंत त्यावरील लागू व्याजदराने पुढील व्याज, परिव्यय आणि प्रभार. **श्री. सिद्धार्थ कुशवाहा - मोबा. क्र. ९५९४९०९४५४** **श्री. जस्टी प्रसाद - मोबा. क्र. ९९८९७६१४७७**	**माहित नाही सांकेतिक कब्जा**
४	**ए) श्री. सुजाता भानुदास कदम आणि श्री. सनिल सुदाम गायकर** **बी) होम स्ट्रीट शाखा** **सी)** फ्लॅट क्र. ७०३, ७वा मजला, शिवगंगा अपार्टमेंट, जुना सर्व्हे क्र. १३०, नवीन सर्व्हे क्र. ८८, हिस्सा क्र. ०४, गाव कांचनगाव, डोंबिवली पूर्व, तालुका-कल्याण, जि.-ठाणे, महाराष्ट्र, पिन-४२१२०१ **डी) श्री. सुजाता भानुदास पाटील आणि श्री. सनिल सुदाम गायकर**	**ए) रु ३८,३०,०००.००** **बी) रु ३,८३,०००.००**	**रु. ३९,३८,०६०.१४/-** (रुपये एकोणचाळीस लाख अडोतीस हजार साठ आणि पैसे चौदा फक्त) दिनांक ३१.१०.२०२५ रोजीस अधिक ०१.११.२०२५ पासून तारखेपर्यंत त्यावरील लागू व्याजदराने पुढील व्याज, परिव्यय आणि प्रभार. **श्री. दिनेश एस. तायडे - मोबा. क्र. ९९६०७१३३७१** **श्री. बसंत पिंगुआ - मोबा. क्र. ९९६०७१३३७१** **श्री. सिद्धार्थ कुशवाहा - मोबा. क्र. ९५९४९०९४५४**	**माहित नाही प्रत्यक्ष कब्जा**
५	**ए) श्री. राशिद अयुबभाई मोटलानी** **बी) आग्रीपाडा शाखा** **सी)** फ्लॅट क्र. २०१, क्षेत्र मोजमापित ६१० चौ. फूट बिल्टअप क्षेत्र, २रा मजला, कादरी टॉवर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमध्ये, सर्व्हे क्र. २२५-ए, २२६, टिका क्र. ०३, के.के. रोड, महागिरी, ठाणे ४००६०१ येथे, ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत स्थित. **डी) श्री. राशिद अयुबभाई मोटलानी आणि सौ. राशिदा राशिद मोटलानी**	**ए) रु ३३,६०,०००.००** **बी) रु ३,३६,०००.००**	**रु. ८,९५,२९५.५२** (रुपये आठ लाख पंच्याण्णव हजार दोनशे पंच्याण्णव आणि पैसे बावन्न फक्त) दिनांक ३०.०९.२०२४ रोजीची अधिक ०१.१०.२०२४ पासून तारखेपर्यंत त्यावरील लागू व्याजदराने पुढील व्याज, परिव्यय आणि प्रभार. **श्री. उत्पल कुमार गोस्वामी - मोबा. क्र. ८६३८३७५१७०** **श्री. सिद्धार्थ कुशवाहा - मोबा. क्र. ९५९४९०९४५४.**	**माहित नाही सांकेतिक कब्जा**
६	**ए) श्री. अँथनी दास मायकेल नाडार** **बी) आग्रीपाडा शाखा** **सी)** फ्लॅट क्र. ३०२, मोजमापित ८९२ चौ. फूट, ३रा मजला, रोझरी अपार्टमेंट, सर्व्हे क्र. १६६ ए, हिस्सा क्र. १४ (भाग), प्लॉट क्र. १०, सिटी क्र. ५७, खुंटावली, अंबरनाथ पश्चिम, जि. ठाणे. **डी) श्री. अँथनी दास मायकेल नाडार आणि कु. सकाया सेल्वी मायकेल नाडार.**	**ए) रु २७,६३,७००.००** **बी) रु २,७६,३७०.००**	**रु ३७,०३,९३१.८५** (रुपये सदोतीस लाख तीन हजार नऊशे एकतीस आणि पैसे पंच्याऐंशी फक्त) दिनांक ३०.०९.२०२४ रोजीस अधिक ०१.१०.२०२४ पासून तारखेपर्यंत त्यावरील लागू व्याजदराने पुढील व्याज, परिव्यय आणि प्रभार. **श्री. उत्पल कुमार गोस्वामी - मोबा. क्र. ८६३८३७५१७०** **श्री. सिद्धार्थ कुशवाहा - मोबा. क्र. ९५९४९०९४५४**	**माहित नाही सांकेतिक कब्जा**
७	**ए) श्री. जयंतीलाल भिमजी भानुशाली आणि ज्योत्स्ना जयंतीलाल भानुशाली** **बी) मुंबई दादर पश्चिम** **सी)** फ्लॅट क्र. २०६, २रा मजला, बी-विंग, रवि खान अपार्टमेंट, गार्डियन स्कूलसमोर, लोढा हेरिटेज रोड, डोंबिवली पूर्व, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे ४२१२०१ **डी) श्री. जयंतीलाल भिमजी भानुशाली आणि सौ. ज्योत्स्ना जयंतीलाल भानुशाली**	**ए) रु २०,०५,१८८.००** **बी) रु २,००,५१८.८०**	**रु. २३,०४,९७७.८५** (रुपये तेवीस लाख चार हजार नऊशे सत्याहत्तर आणि पैसे पंच्याऐंशी फक्त) दिनांक ३०.०६.२०२४ रोजीस अधिक ०१.०७.२०२४ पासून तारखेपर्यंत त्यावरील लागू व्याजदराने पुढील व्याज, परिव्यय आणि प्रभार. **श्री. बसंत कुमार पिंगुआ - मोबा. क्र. ९९६०७१३३७१**	**माहित नाही प्रत्यक्ष कब्जा**
८	**ए) सौ. बिमला कैलास कुमावत आणि श्री. कैलास कुमावत** **बी) भुलेश्वर शाखा, मुंबई** **सी)** निवासी फ्लॅट क्र. ३०२, ए विंग, भैरव दर्शन टॉवर सीएचएसएल, केबिन क्रॉस रोड, पूजा नगर, भाईंदर पूर्व, ठाणे - ४०११०५. **डी) श्री. मनोज कैलास कुमावत, कु. रवीना के कुमावत आणि कु. मानसी कुमावत हे सौ. बिमला कैलास कुमावत आणि श्री. कैलास कुमावत (मयत) यांचे कायदेशीर वारस.**	**ए) रु २७,५४,०००.००** **बी) रु २,७५,४००.००**	**रु. १६,८५,८०३/-** (रुपये सोळा लाख पंच्याऐंशी हजार आठशे तीन फक्त) दिनांक २८.०२.२०२५ रोजीस अधिक ०१.०३.२०२५ पासून तारखेपर्यंत त्यावरील लागू व्याजदराने पुढील व्याज, परिव्यय आणि प्रभार. **श्री. विकास राठी - मोबा. क्र. ९३५०३७००२०**	**माहित नाही सांकेतिक कब्जा**
९	**ए) मे. वेंकटेश्वरा स्टील** **बी) भायखळा शाखा** **सी)** ऑफिस क्र. ३१३, ३रा मजला, मोजमापित क्षेत्र १७० चौ. फूट, लोहा भवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमध्ये, पी. डी'मेलो रोड येथे स्थित, मस्जिद, मुंबई-४००००९, प्रिन्सेस डॉक डिव्हिजन च्या प्लॉट क्र. ३ आणि ४ आणि सीएस क्र. ४३/१ आणि ४४/१ धारक जमिनीचा प्लॉट. **डी) मे. एलमेक इंजिनिअर्स**	**ए) रु ६६,९२,०००.००** **बी) रु ६,६९,२००.००**	**रु. २,६३,६३,४०४.३९** (रुपये दोन कोटी त्रेसष्ट लाख त्रेसष्ट हजार चारशे चार आणि पैसे एकोणचाळीस फक्त) दिनांक ३०.०९.२०२५ रोजीस अधिक ०१.१०.२०२५ पासून तारखेपर्यंत त्यावरील लागू व्याजदराने पुढील व्याज, परिव्यय आणि प्रभार. **श्री. विकास राठी - मोबा. क्र. ९३५०३७००२०**	**माहित नाही सांकेतिक कब्जा**
१०	**ए) मे. वेंकटेश्वरा स्टील** **बी) भायखळा शाखा** **सी)** ऑफिस क्र. ३१४, ३रा मजला, मोजमापित क्षेत्र १७० चौ. फूट, लोहा भवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमध्ये, पी. डी'मेलो रोड येथे स्थित, मस्जिद, मुंबई-४००००९, प्रिन्सेस डॉक डिव्हिजन च्या प्लॉट क्र. ३ आणि ४ आणि सीएस क्र. ४३/१ आणि ४४/१ धारक जमिनीचा प्लॉट. **डी) श्री. निलेश राठी**	**ए) रु ६६,९२,०००.००** **बी) रु ६,६९,२००.००**	**रु. २,६३,६३,४०४.३९** (रुपये दोन कोटी त्रेसष्ट लाख त्रेसष्ट हजार चारशे चार आणि पैसे एकोणचाळीस फक्त) दिनांक ३०.०९.२०२५ रोजीस अधिक ०१.१०.२०२५ पासून तारखेपर्यंत त्यावरील लागू व्याजदराने पुढील व्याज, परिव्यय आणि प्रभार. **श्री. विकास राठी - मोबा. क्र. ९३५०३७००२०** **श्री. सिद्धार्थ कुशवाहा - मोबा. क्र. ९५९४९०९४५४**	**माहित नाही सांकेतिक कब्जा**

बोलीदारांनी ई-लिलावात भाग घेण्यासाठी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी ई लिलावाच्या तपशीलवार अटी आणि शर्ती करिता बँकेची वेबसाईट: **https://www.unionbankofindia.bank.in/auction-property/view-auction-property.aspx** ला भेट द्यावे. बोलीदार पोर्टल ची वेबसाईट: **https://baanknet.com** ला सुद्धा भेट देऊ शकतात.

इच्छुक बोलीदारांना ऑनलाईन लिलावात सहभागी होण्याकरिता वैध ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे.विक्रीच्या अटी आणि शर्ती दि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या तरतुदीनुसार काटेकोर राहतील.

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६)/ नियम ९(१) अन्वये १५ दिवसांची सांविधिक विक्री सूचना

सदर वरील नमूद तारखेस ई-लिलाव करण्याबाबत सदर कर्जाचे कर्जदार आणि हमीदार यांना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६)/ नियम ९(१) अन्वये सुध्दा सूचना समजण्यात यावी. विक्रीच्या अटी आणि शर्तींच्या तपशिलाकरिता पुरविलेल्या लिंकचा म्हणजेच कृपया **https://www.unionbankofindia.bank.in/auction-property/view-auction-property.aspx** किंवा **https://baanknet.com** चा संदर्भ घ्यावा.

दिनांक : ११.०८.२०२६
ठिकाण : मुंबई

सही/-
प्राधिकृत अधिकारी, युनियन बँक ऑफ इंडिया

Aditya Birla Sun Life AMC Ltd.

ADITYA BIRLA CAPITAL
ALTERNATE INVESTMENTS

आदित्य बिर्ला सन लाइफ एएमसी लिमिटेड | सीआयएन:L65991MH1994PLC080811
वन वर्ल्ड सेंटर, टॉवर 1, 17 वा मजला, ज्युपिटर मिल्स, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन रोड, मुंबई- 400 013. दूरध्वनी क्रमांक: 43568000 | फॅक्स: 43568110/8111

एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्टसाठी आमंत्रण

सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाकडे [श्रेणी II] पर्यायी गुंतवणूक निधी म्हणून नोंदणीकृत असलेला एक निधी, ज्यास यापुढे **'फंड'** असे म्हटले आहे, याद्वारे फंडाच्या युनिट्सच्या अधिग्रहणासाठी संभाव्य गुंतवणूकदारांकडून एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट (यापुढे **"EOI"**म्हणून संबोधित) आमंत्रित करत आहे.

फंडाचे युनिट्स परताव्याची कोणतीही हमी न देता, "जसे आहे, जिथे आहे" या तत्त्वावर देऊ केले जात आहेत.

बोलींसाठीचे हे आमंत्रण फंडाच्या जारी असलेल्या युनिट्सपैकी किमान २५% युनिट्ससाठी आहे, जे फंडाच्या रोखीकरण न झालेल्या गुंतवणूक पोर्टफोलिओमधील एकत्रित हितसंबंध दर्शवतात.

इच्छुक पक्ष अधिक माहिती मिळवण्यासाठी खाली दिलेल्या तपशिलानुसार आमच्याशी संपर्क साधू शकतात. सविस्तर माहिती मिळवणे हे गोपनीयता कराराच्या निष्पादनाच्या अधीन असेल, ज्यानंतर रोखीकरण न झालेल्या पोर्टफोलिओसंबंधीची माहिती उपलब्ध करून दिली जाईल.

EOI सादर करण्याची अंतिम तारीख **संध्याकाळी ६.०० वाजता (भारतीय प्रमाणवेळ), २० ऑगस्ट २०२६** ही आहे.

कोणतीही EOI स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा, हे आमंत्रण रद्द करण्याचा किंवा मागे घेण्याचा, किंवा नवीन EOI आमंत्रित करण्याचा अधिकार फंडाने आपल्या पूर्ण स्वविवेकाधिकारात राखून ठेवला आहे; आणि यासाठी कोणतेही कारण देण्याची आवश्यकता नसेल तसेच फंडावर कोणतेही दायित्व किंवा बांधिलकी राहणार नाही.

संपर्क तपशील: arvindkumar.sharma@adityabirlacapital.com

आदित्य बिर्ला सन लाइफ एएमसी लिमिटेड
स्वाक्षरी/-
अधिकृत स्वाक्षरीकर्ता

दिनांक: ऑगस्ट 11, 2026
स्थळ: मुंबई

सिक्युरिटीजमधील गुंतवणूक ही बाजारातील जोखमीच्या अधीन आहे आणि गुंतवणुकीचे उद्दिष्ट साध्य होईलच याची कोणतीही शाश्वती किंवा हमी नसते.

---

asianpaints

एशियन पेंट्स लिमिटेड
सीआयएन: L24220MH1945PLC004598
नोंदणीकृत कार्यालय: ६अ आणि ६ब, शांतीनगर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५, महाराष्ट्र, इंडिया
दूरध्वनी क्र.: (०२२) ६२१८ १००० | **वेबसाईट:** www.asianpaints.com
ईमेल: investor.relations@asianpaints.com

पोस्टल बॅलेट सूचना आणि रिमोट ई-व्होटिंग माहिती

कंपनीच्या सर्व भागधारकांना याद्वारे सूचित करण्यात येते की कंपनी कायदा, २०१३ चे कलम १०८, ११० आणि इतर लागू असलेल्या तरतुदी (असल्यास), कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ चे नियम २० आणि २२ (वेळोवेळी झालेल्या वैधानिक सुधारणा किंवा पुनर्निर्माणांसह), कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (एमसीए) २२ सप्टेंबर २०२५ रोजी जारी केलेले सामान्य परिपत्रक क्र. ०३/२०२५ आणि वेळोवेळी जारी केलेली इतर संबंधित परिपत्रके, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया द्वारे जारी केलेले जनरल मीटिंग्सवरील सिक्रेटरीअल स्टँडर्ड - २, भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिसक्लोझर रिक्वायरमेंटस) नियमावली २०१५ चे नियम ४४ आणि इतर सर्व लागू कायदे व नियमांचे पालन करून कंपनीने शुक्रवार, ३१ जुलै २०२६ ('कट-ऑफ तारीख') रोजी कंपनीच्या सदस्य नोंदणी पुस्तकात किंवा डिपॉझिटरीजद्वारे ठेवलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंदणी पुस्तकात ज्यांची नावे समाविष्ट आहेत आणि ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी/नोंदणी व समभाग हस्तांतरण एजंट ('आरटीए') किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदणीकृत आहेत, अशा सर्व सदस्यांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून **सोमवार, १० ऑगस्ट २०२६** रोजी स्पष्टीकरण विवरणपत्रासह पोस्टल बॅलेट सूचना (सूचना) पाठवण्याचे काम पूर्ण केले आहे. ही सूचना खालील विषयावर इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानाद्वारे पोस्टल बॅलेटच्या माध्यमातून कंपनीच्या भागधारकांची मंजुरी मागविणे:

प्रस्तावाचा तपशील	प्रस्ताव
साधारण	श्रीमती शुभलक्ष्मी दानी (डीआयएनः ०२९४२१३८) यांची कंपनीच्या नॉन-एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर (रोटेशनद्वारे निवृत्त होण्यास पात्र) म्हणून नियुक्ती करणे.

कंपनीने आपल्या भागधारकांना रिमोट ई-व्होटिंग सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडची सेवा घेतली आहे. रिमोट ई-व्होटिंगची संपूर्ण प्रक्रिया सूचनेचा एक भाग म्हणून देण्यात आली आहे.

रिमोट ई-व्होटिंग वेळापत्रक

पात्रतेसाठी कट-ऑफ तारीख	शुक्रवार, ३१ जुलै २०२६
ई-व्होटिंगची सुरुवात	मंगळवार, ११ ऑगस्ट २०२६ (सकाळी ९:०० वाजता भाप्रवे)
ई-व्होटिंगची समाप्ती	बुधवार, ९ सप्टेंबर २०२६ (संध्याकाळी ५:०० वाजता भाप्रवे)

कृपया नोंद घ्यावी की, भागधारकांना संमती किंवा असहमती केवळ दूरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारे नोंदविता येईल. भागधारकांचे मतदानाचे अधिकार कट-ऑफ दिनांकास कंपनीच्या भरलेल्या इक्विटी समभाग भांडवलामध्ये त्यांच्या मालकीच्या समभागांच्या प्रमाणात असतील.

कट-ऑफ दिनांकास जे व्यक्ती कंपनीचे भागधारक नसतील, त्यांनी ही सूचना केवळ माहितीच्या उद्देशाने समजावी. एखाद्या ठरावावर एकदा मतदान केल्यानंतर भागधारकांना त्यांचे मतदान नंतर बदलता येणार नाही.

दूरस्थ ई-मतदानाची सुविधा बुधवार, ९ सप्टेंबर २०२६ रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील. त्यानंतर एनएसडीएल द्वारे दूरस्थ ई-मतदान सुविधा निष्क्रिय करण्यात येईल.

कंपनीच्या संचालक मंडळाने दूरस्थ ई-मतदान प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी श्री. मकरंद एम. जोशी (सदस्यत्व क्र.: ५५३३, सराव प्रमाणपत्र क्र.: ३६६२) आणि त्यांच्या अनुपस्थितीत सुश्री. कुमुदिनी भालेराव (सदस्यत्व क्र.: ६६६७, सराव प्रमाणपत्र क्र.: ६६९०), भागीदारांने, मकरंद एम. जोशी अँड कंपनी, कार्यरत कंपनी सेक्रेटरी, यांची रिमोट ई-व्होटिंगद्वारे पोस्टल बॅलेट निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी स्क्रुटिनायझर म्हणून नियुक्ती केली आहे.

ही सूचना कंपनीच्या www.asianpaints.com या संकेतस्थळांवर, एनएसडीएलच्या www.evoting.nsdl.com या संकेतस्थळांवर तसेच कंपनीचे इक्विटी समभाग सूचीबद्ध असलेल्या शेअर बाजारांच्या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. यामध्ये बीएसई लिमिटेड (बीएसई) www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई) www.nseindia.com यांचा समावेश आहे.

इलेक्ट्रॉनिक स्वरूपात समभाग धारण करणारे आणि ज्यांनी आपला ई-मेल पत्ता किंवा केवायसी तपशील अद्ययावत केलेला नाही, अशा भागधारकांनी संबंधित डिपॉझिटरी सहभागी संस्थेने सुचविलेल्या प्रक्रियेनुसार आपल्या डिमॅट खात्यामध्ये आवश्यक तपशील नोंदवावा किंवा अद्ययावत करावा.भौतिक स्वरूपात समभाग धारण करणारे आणि ज्यांनी आपला ई-मेल पत्ता किंवा केवायसी तपशील अद्ययावत केलेला नाही, अशा भागधारकांनी कंपनीचे नोंदणी व समभाग हस्तांतरण एजंट (आरटीए), एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीचे लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) यांच्याकडे विहित फॉर्म आयएसआर-१ द्वारे सदर तपशील नोंदवावा किंवा अद्ययावत करावा. संबंधित फॉर्म कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत https://www.asianpaints.com/ShareholderServiceRequest.html.

पर्यायी

अनधिकृत हॉटेलांवर हातोडा

राष्ट्रीय महामार्गांवर न्यायालयाच्या निर्देशानुसार कारवाईचे सरकारचे आदेश

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

- अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामांना आळा घालण्याचा प्रयत्न
- आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश
- ६० दिवसांत कारवाई पूर्ण करण्याच्या सक्त सूचना

चित्र : संग्रहित

राष्ट्रीय महामार्गांच्या हद्दीत (राइट ऑफ वे अंतर्गत) असणारे अनधिकृत धाबे, हॉटेले आणि इतर व्यावसायिक बांधकामांवर आता हातोडा पडणार आहे. राष्ट्रीय महामार्ग एनएचएआयवर असलेल्या अतिक्रमण आणि अनधिकृत व्यावसायिक बांधकामांना आळा घालण्यासाठी राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांची राज्यातील सर्व महापालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, असे आदेश नगरविकास विभागाने सोमवारी जारी केले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या १३ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या निर्देशांनुसार राष्ट्रीय महामार्गाच्या 'राइट ऑफ वे' क्षेत्रात नव्याने ढाबा, हॉटेल किंवा कोणतेही व्यावसायिक बांधकाम करणे तत्काळ प्रभावाने प्रतिबंधित करण्यात आले आहे. तसेच अनधिकृत नवीन अथवा सध्या असलेली बांधकामे हटविण्याची कारवाई संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी निर्धारित प्रक्रियेनुसार ६० दिवसांत करावी, असे निर्देशही देण्यात आले आहेत. या शासन निर्णयानुसार महामार्गाच्या सुरक्षा क्षेत्रात कोणत्याही ठिकाणी परवाना, ना-हरकत प्रमाणपत्र अथवा व्यापार परवानगी देण्यापूर्वी संबंधित प्राधिकरणाने 'नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया' (एनएचएआय) किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाची मंजुरी घेणे बंधनकारक राहणार आहे. अशा ठिकाणी यापूर्वी देण्यात आलेल्या परवान्यांचाही ३० दिवसांत आढावा घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

> **“ सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांची राज्यातील सर्व महापालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींनी काटेकोर अंमलबजावणी करावी.**
>
> **– नगरविकास विभाग**

दर १५ दिवसांनी आढावा बैठक

प्रत्येक जिल्ह्यात महामार्ग सुरक्षा कृती दलराष्ट्रीय महामार्ग असलेल्या प्रत्येक जिल्ह्यात महामार्ग सुरक्षा कृती दल स्थापन करण्याचे निर्देशही सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. या कृती दलात जिल्हा प्रशासन, पोलिस, एनएचएआय किंवा संबंधित जमीन मालकीची संस्था, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकाऱ्यांचा समावेश असेल. अतिक्रमण हटविण्याची वेळेवर कारवाई करण्याची संयुक्त जबाबदारी जिल्हाधिकारी आणि पोलिस आयुक्त अथवा पोलिस अधीक्षक यांच्यावर राहणार आहे. या कृती दलाने दर १५ दिवसांनी आढावा बैठक घेऊन त्याची इतिवृत्त नोंद ठेवावी, असेही निर्देश आहेत.

जमीन वापरास प्रतिबंध

महामार्ग मध्यबिंदूपासून निवासी वापरासाठी ४० मीटर, व्यावसायिक वापरासाठी ७५ मीटर अंतराआत जमीन वापर बदल करण्यास प्रतिबंध करणाऱ्या अधिसूचना ६० दिवसांत जारी करण्याचे निर्देश दिले आहेत.

‘शप’ खासदार पंतप्रधानभेटीला

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

राजकीय चर्चा झाली नसल्याचा दावा

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या आठ खासदारांनी सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. सुमारे २० मिनिटे चाललेल्या या भेटीदरम्यान खासदारांनी राज्यातील त्यांच्या मतदारसंघाचे प्रश्न मांडल्याचा दावा केला. खासदारांच्या या शिष्टमंडळाचे नेतृत्व राष्ट्रवादीच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी केले.

या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदी यांच्याशी कुठल्याही प्रकारची राजकीय चर्चा झाल्या नसल्याचा दावा शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केला. तसेच, महात्मा जोतिराव फुले, सावित्रीबाई फुले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा, अशीही मागणी यावेळी खासदारांनी केली. मात्र २० मिनिटांत आठ खासदारांच्या मतदारसंघांतील प्रश्न कसे काय मांडले याबाबत राजकीय क्षेत्रात आश्चर्य व्यक्त होत आहे.

‘डीलिमिटेशन’पासून सुरुवात?

गेल्या काही महिन्यांपासून राष्ट्रवादी शप पक्ष हा एनडीएमध्ये सहभागी होऊ शकते अशी चर्चा सुरू आहे. त्याची सुरुवात मतदारसंघ फेररचना विधेयकाला पाठिंबा देऊन होईल, असेही बोलले जात होते. यावर, ‘हे विधेयक चर्चेला येऊ द्या. विधेयकाचा मसुदा समजू द्या. त्यामध्ये नेमके आक्षेप काय आहेत, या गोष्टी समोर येऊ द्या. त्यानंतर त्यावर भाष्य करणे उचित ठरेल’, असे डॉ. कोल्हे म्हणाले.

‘यात काहीच वावगे नाही’

नागपूर : ‘पंतप्रधान हे कोणत्याही एका पक्षाचे नसून संपूर्ण देशाचे असतात. त्यामुळे कोणत्याही पक्षातील नेत्यांनी त्यांची भेट घेतली, तर त्यात वावगे काही नाही’, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी या भेटीवर दिली. ते नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. ‘राष्ट्रवादीच्या नेत्यांनी पंतप्रधानांची भेट घेतली असेल, तर त्याकडे वेगळ्या दृष्टीने पाहण्याचे कारण नाही’, असे ते म्हणाले.

सुळे यांच्या कन्येच्या स्वागत समारंभात मोदी-शहा

राष्ट्रवादी ‘शप’ पक्षाच्या आठ खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेतल्यानंतर सुप्रिया सुळे यांच्या कन्येच्या लग्नाच्या स्वागत समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी हजेरी लावली. मोदी-शहा यांच्या या उपस्थितीमुळे डीलिमिटेशन विधेयकाबाबत राष्ट्रवादी काँग्रेस ‘शप’ची भूमिका मवाळ होते की काय, अशी चर्चा दिल्लीच्या राजकारणात रंगली आहे.

एसटीच्या कर्मचाऱ्यांचे वेतन आज जमा होणार

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

प्रताप सरनाईक यांची माहिती

दर महिन्याच्या सात तारखेला अदा होणारे एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन प्रशासकीय दिरंगाई आणि सलग आलेल्या सुट्ट्यांमुळे यंदा लांबले. मात्र, एसटी महामंडळाच्या तब्बल ८६ हजार कर्मचाऱ्यांचे जुलै महिन्याचे वेतन आज, मंगळवारी त्यांच्या बँक खात्यात जमा होईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सोमवारी दिली.

एसटी महामंडळाकडून दर महिन्याला सरकारच्या विविध सवलतींच्या प्रतिपूर्ती रकमेची माहिती वित्त विभागाला नियमितपणे सादर केली जाते. जुलै महिन्याची माहितीही वेळेत सादर करण्यात आली होती. मात्र, सरकारकडून प्रतिपूर्तीची रक्कम वेळेत प्राप्त न झाल्याने कर्मचाऱ्यांच्या वेतनावर परिणाम झाला. साधारणपणे महिन्याच्या ७ ते १० तारखेपर्यंत एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन अदा केले जाते. परंतु, यावेळी सलग आलेल्या सुट्ट्या आणि प्रशासकीय प्रक्रियेला झालेल्या विलंबामुळे वेतन १० तारखेपर्यंत झालेले नाही. प्रतिपूर्ती रकमेबाबतचा शासन निर्णय सोमवारी प्राप्त झाला असून, ११ ऑगस्टला सर्व एसटी कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये वेतन जमा होणार आहे.

दरम्यान, यापुढे वेतन देण्यास कोणत्याही प्रकारचा विलंब होता कामा नये, अशा स्पष्ट सूचना मंत्री सरनाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. 'वेतनाला विलंब झाल्यास त्याचा थेट परिणाम एसटी कर्मचाऱ्यांच्या आर्थिक नियोजनावर होतो. बँकेचे कर्जाचे हप्ते वेळेत न भरल्यास अतिरिक्त व्याज किंवा दंडाचा भुर्दंड कर्मचाऱ्यांना सहन करावा लागतो', असे ते म्हणाले.

‘भारताची घोडदौड रोखण्याचे प्रयत्न’

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

परकीय शक्तींवर मुख्यमंत्र्यांचा आरोप

वरळीतील तिरंगा यात्रेत मुख्यमंत्री सहभागी झाले होते.

‘भारताला आता कुणीही थांबवू शकत नाही. मात्र तरीही काही परकीय शक्ती भारताची घौडदौड थांबवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. भारत हा जगातील महासत्ता असलेला देश होईल, अशी भीती वाटत असल्यानेच परकीय शक्तींचा हा डाव आहे’, असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केला. आताची क्रांती ही देशविरोधी शक्तींला भारत छोडो असे म्हणण्याची आहे, असेही ते म्हणाले.

देशभरात १५ ऑगस्ट या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून तिरंगा रॅलीचे आयोजन केले असून मुंबईतही सोमवारी वरळी परिसरात भाजपच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत तिरंगा रॅली काढण्यात आली होती. या रॅलीमध्ये सहभागी होतानाच फडणवीस यांनी भाषणासोबत देशभक्तीपर गाणेही म्हटले. यावेळी मुंबईच्या महापौर रितू तावडे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मुंबई अध्यक्ष अमित साटम यांच्यासह आशीष शेलार, मंगलप्रभात लोढा हे मंत्री आदी उपस्थित होते.

‘आपल्याला एकच मंत्र घ्यावा लागेल, आपल्याला सोबत तिरंगा घेऊन एकत्रित चालावे लागेल. मरते दम तक साथ चलेंगे ही नवभारताची संकल्पना मोदी यांनी मांडली. आताही जबाबदारी तुमची आहे, ती पार पाडू या’, असे आवाहन त्यांनी केले. ‘९ ऑगस्ट १९४२ ची क्रांती ही 'भारत छोडो'ची होती, आताची क्रांती 'करो या मरो'ची आहे, विकसित भारताची आहे, आताची क्रांती देशविरोधी शक्तीला भारत छोडो म्हणण्याची आहे’, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

‘मला आज दोन सागर दिसत आहेत, एक हिंद महासागर आणि दुसरीकडे तिरंगा महासागर पाहायला मिळतोय. जोपर्यंत चंद्र आणि सूर्य आहे, तोपर्यंत तिरंगा आता खाली येणार नाही. भारत जगातील चौथी आर्थिक महासत्ता झाला आहे. सध्या आयटी, एआय यामध्ये जगात सगळ्यांशी मुकाबला भारत देश करत आहे. भारत सर्वाधिक युवा असलेला देश झाला आहे. पण, भारत जगात महासत्ता होईल या भीतीमुळे काही परकीय शक्ती भारताला थांबविण्याचा प्रयत्न करत आहेत’, असा आरोप त्यांनी केला.

‘तरुणाईला थांबवण्याची ताकद तुमच्यात नाही’

‘भारताच्या अंतर्गत प्रकरणांत काही ना काही लुडबूड करण्याचा प्रयत्न काहीजण करतात. मात्र, ही तिरंगा हाती घेऊन बाहेर पडलेली तरुणाई आहे, यांना थांबवण्याची ताकद तुमच्यात नाही, हे मी नमूद करू इच्छितो. भारताला थांबविण्याची ताकद तुमच्यात नाही, भारत हा पुढे जात राहणारच असून आता दोन दशके बाकी आहेत. २०४७ मध्ये विकसित भारत आपल्याला पाहायला मिळेल’, असेही फडणवीस यांनी म्हटले.

‘इनोव्हेशन हब’साठी युवा कल्पनांना व्यासपीठ

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

‘द गव्हर्नन्स चॅलेंज २०२६’चे चौथे पर्व घोषित

महाराष्ट्राला ‘इनोव्हेशन हब’ म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने प्रशासनासमोरील आव्हानांवर नावीन्यपूर्ण उपाय सुचविण्यासाठी युवा प्रतिभांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ‘द गव्हर्नन्स चॅलेंज टीजीसी २०२६’च्या चौथ्या पर्वाची राज्य सरकारने घोषणा केली आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी येथे सांगितले.

भारतातील राज्य सरकार व्यवस्थेवर केंद्रित पहिली राष्ट्रीय प्रशासन केंद्रित स्पर्धा म्हणून आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमाच्या माध्यमातून देशातील प्रतिभावान युवा विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या नवोन्मेषाच्या भविष्यासाठी नावीन्यपूर्ण उपाय सुचविण्याची संधी मिळणार आहे. राज्य शासनाच्या पुढाकारने, गेट्स फाउंडेशनच्या सहकार्याने आणि समग्र संस्थेच्या आयोजनातून ही स्पर्धा होणार आहे. देशातील ३० नामांकित विद्यापीठ आणि पब्लिक पॉलिसी संस्थांमधील विद्यार्थी यामध्ये सहभागी होणार आहेत.

या स्पर्धेत सहभागी विद्यार्थी महाराष्ट्राच्या दीर्घकालीन महत्त्वाच्या प्राधान्यक्रमांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राला नवोन्मेषाचे प्रमुख केंद्र करण्यासाठी उपाययोजना आणि प्रभावी सूचना सुचविणार आहेत. विकसित भारत २०४७चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जटिल विकासविषयक आव्हानांवर उपाय शोधणारे, उत्पादकता वाढविणारे आणि नव्या आर्थिक संधी निर्माण करणारे नवोन्मेष आवश्यक आहेत. या धोरणांतर्गत पुढील पाच वर्षांत ५० हजार स्टार्टअप्सना मान्यता देणे आणि १.२५ लाख उद्योजकांना प्रोत्साहन देणे, हे उद्दिष्ट निश्चित केले आहे.

गणेशोत्सवाच्या नियोजनासाठी आज बैठक

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

साधारण महिन्यावर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवाच्या नियोजनासाठी कौशल्य मिळवासमेरी तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे सहपालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आज, मंगळवारी मुंबईतील गणेशोत्सव मंडळांच्या प्रतिनिधींची संयुक्त बैठक आयोजित केली आहे. दुपारी अडीच वाजता नाना चौक येथील मुंबई महापालिकेच्या डी विभागाच्या दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात आयोजित बैठकीत गणेशोत्सवाच्या आयोजनावर चर्चा होणार आहे. मुंबईत सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. गिरगाव चौपाटी येथे मोठ्या प्रमाणात विविध मंडळाचे गणपती विसर्जनासाठी येतात. त्या अनुषंगाने प्रशासनामार्फत विविध उपाययोजना करण्यात येतात. याबाबत सुसूत्रीकरण आणि समन्वय असणे आवश्यक आहे. गणेशोत्सव शांततेत, शिस्तबद्ध पद्धतीने आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडण्यासाठी प्रशासन आणि गणेशोत्सव मंडळांमध्ये समन्वय साधण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण ठरणार आहे, असे लोढा म्हणाले. यंदा १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या कालावधीत गणेशोत्सव होत असून विविध उपक्रमांचे योग्य नियोजन, समन्वय तसेच गणेशोत्सव मंडळांना आवश्यक सूचना आणि मार्गदर्शन देण्याच्या उद्देशाने या संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. मंडळांच्या प्रतिनिधींनी या बैठकीस उपस्थित राहून आपल्या सूचना मांडाव्यात, असे आवाहन लोढा यांनी केले आहे.

‘सुरक्षा कायद्यास निरर्थक विरोध’

मुंबई : डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी संघटना किंवा तत्सम हिंसक व बेकायदा कारवाया करणाऱ्या संघटनांच्या कृत्यांना प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने गेल्या वर्षी आणलेल्या महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिका निरर्थक असल्याचे म्हणणे राज्य सरकारने सोमवारी मुंबई उच्च न्यायालयात मांडले. तसेच, या याचिका फेटाळून लावण्याची विनंतीही सरकारने केली.

‘मुदतबाह्य पदार्थ ‘एफडीए’कडे सोपवा’

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

‘ॲमेझॉन रिटेल इंडिया’ला उच्च न्यायालयाचे निर्देश

‘भिवंडीमधील गोदामातील सर्व मुदतबाह्य पदार्थ व खराब झालेला माल राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाकडे (एफडीए) सोपवावा’, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी ‘ॲमेझॉन रिटेल इंडिया’ला दिले. तसेच, आपल्यावर नियमबाह्य कारवाई झाल्याचा आरोप करत ॲमेझॉनने केलेल्या याचिकेबाबत उत्तर दाखल करण्याचे निर्देश न्यायालयाने ‘एफडीए’ला दिले.

‘काही पदार्थ मुदतबाह्य असल्याचे तपासणीत आढळल्यानंतर ‘एफडीए’ने आमचा परवाना त्वरित निलंबित केला. त्यानंतर आम्ही नोटिशीला उत्तर दिले असताना आणि अपिल प्रलंबित असताना परवाना रद्दबातल करून गोदामही सील केले. त्यामुळे ही नैसर्गिक न्यायतत्त्वांचे उल्लंघन करणारी व नियमबाह्य कृती आहे’, असा दावा करत ‘ॲमेझॉन रिटेल इंडिया’ने याचिका केली आहे. त्याविषयी प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे व न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर पुढील सुनावणी झाली. तेव्हा, मुख्य सरकारी वकील नेहा भिडे यांनी कारवाईचे समर्थन करणाय युक्तिवाद मांडला.

‘भिवंडीमध्ये विषबाधेची गंभीर घटना घडल्यानंतर ‘एफडीए’ने विविध आस्थापनांची तपासणी केली. तेव्हा गोदामात मुदतबाह्य पदार्थांची नियमानुसार विल्हेवाट होत नसल्याचे आढळले. म्हणून आम्ही त्यांना तीनदा संधी दिली. तरीही समाधानकारक उत्तर मिळाले नाही’, असे भिडे यांनी न्यायालयाला सांगितले. तर ‘सीसीटीव्ही फूटेज उपलब्ध आहेत. नेमके कोणते हवे आहेत, ते ‘एफडीए’च्या अधिकाऱ्यांनी सांगितलेच नाही’, असे म्हणणे कंपनीतर्फे ज्येष्ठ वकील व्यंकटेश धोंड यांनी मांडले.

अखेरीस, खंडपीठाने याचिकेतील आरोपांबाबत २२ ऑगस्टपर्यंत प्रतिज्ञापत्रावर उत्तर दाखल करण्याचे निर्देश ‘एफडीए’ला दिले आणि २७ ऑगस्टला या प्रकरणाच्या गुणवत्तेवर सुनावणी घेणार असल्याचे नमूद केले.

भार कंपनीवर

कंपनीने आपल्या गोदामातील मुदतबाह्य पदार्थ व मालाची यादी तीन दिवसांत ‘एफडीए’कडे देण्याची तयारी दर्शवली. त्यानुसार, ते पदार्थ व माल ‘एफडीए’नेच या सीलबंद गोदामातून काढून नष्ट करावेत आणि त्याचा खर्च कंपनीने उचलावा, असे खंडपीठाने आदेशात स्पष्ट केले.

गोकुळ दुधाच्या किंमतीत बदल

गोकुळ दुधाच्या सर्व ग्राहकांना कळविण्यात येते की, संघामार्फत दि. ११-०८-२०२६ पासून (दि. १०-०८-२०२६ च्या मध्यरात्री पासून) गोकुळ ब्रॅण्डच्या फुल क्रिम दुधाच्या ग्राहक दरात प्रति लिटर रु.२ प्रमाणे दर वाढ करण्यात येत आहे. ग्राहक दर खालील प्रमाणे राहतील.

दुधाचा प्रकार	पॅकींग	सध्याचा ग्राहक दर (रु. प्रति लिटर)	सुधारीत ग्राहक दर (रु. प्रति लिटर)	दर रुपये प्रति युनिट
फुल क्रिम दूध	५०० मिली	७६/-	७८/-	३९/-
	१ लिटर	७६/-	७८/-	७८/-
	५ लिटर	७५/-	७७/-	३८५/-

गोकुळ ब्रॅडच्या गाय दूध, टोण्ड दूध व गोकुळ शक्ती दुधाच्या ग्राहक दरात कोणताही बदल करणेत आलेला नाही. याची ग्राहकांनी नोंद घ्यावी व सहकार्य करावे.

कार्यकारी संचालक — अध्यक्ष, प्राधिकृत अधिकारी मंडळ

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या., कोल्हापूर

TOI

भारतातील सर्वाधिक वाचले जाणारे न्यूज़ ॲप

10 कोटींहून अधिक वाचकांचा विश्वास

भारतातील नंबर 1 न्यूज़ ब्रँड

24x7 बेकिंग न्यूज़

TOI ॲप डाउनलोड करा

asianpaints

एशियन पेंट्स लिमिटेड
सीआयएन: L24220MH1945PLC004598
नोंदणीकृत कार्यालय: ६अ आणि ६ब, शांतीनगर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५, महाराष्ट्र, इंडिया
दूरध्वनी क्र.: (०२२) ६२१८ १००० । वेबसाईट: www.asianpaints.com
ईमेल: investor.relations@asianpaints.com

पोस्टल बॅलेट सूचना आणि रिमोट ई-व्होटिंग माहिती

कंपनीच्या सर्व भागधारकांना याद्वारे सूचित करण्यात येते की कंपनी कायदा, २०१३ चे कलम १०८, ११० आणि इतर लागू असलेल्या तरतुदी (असल्यास), कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ चे नियम २० आणि २२ (वेळोवेळी झालेल्या वैधानिक सुधारणा किंवा पुनर्नियमांसह), कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (एमसीए) २२ सप्टेंबर २०२५ रोजी जारी केलेले सामान्य परिपत्रक क्र. ०३/२०२५ आणि वेळोवेळी जारी केलेली इतर संबंधित परिपत्रके, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया द्वारे जारी केलेले जनरल मीटिंग्सवरील सेक्रेटरीअल स्टँडर्ड – २, भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिसक्लोझर रिक्वायरमेंटस) नियमावली २०१५ चे नियम ४४ आणि इतर सर्व लागू कायदे व नियमांचे पालन करून कंपनीने शुक्रवार, ३१ जुलै २०२६ ('कट-ऑफ तारीख') रोजी कंपनीच्या सदस्य नोंदणी पुस्तकात किंवा डिपॉझिटरीद्वारे ठेवलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंदणी पुस्तकात ज्यांची नावे समाविष्ट आहेत आणि ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी/नोंदणी व समभाग हस्तांतरण एजंट ('आरटीए') किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदणीकृत आहेत, अशा सर्व सदस्यांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सोमवार, १० ऑगस्ट २०२६ रोजी स्पष्टीकरण विवरणपत्रासह पोस्टल बॅलेट सूचना (सूचना) पाठवण्याचे काम पूर्ण केले आहे. ही सूचना खालील विषयावर इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानाद्वारे पोस्टल बॅलेटच्या माध्यमातून कंपनीच्या भागधारकांची मंजुरी मागविणे:

प्रस्तावाचा तपशील	प्रस्ताव
साधारण	श्रीमती शुभलक्ष्मी दानी (डीआयएन: ०२९४२१३८) यांची कंपनीच्या नॉन-एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर (रोटेशनद्वारे निवृत्त होण्यास पात्र) म्हणून नियुक्ती करणे.

कंपनीने आपल्या भागधारकांना रिमोट ई-व्होटिंग सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडची सेवा घेतली आहे. रिमोट ई-व्होटिंगची संपूर्ण प्रक्रिया सूचनेचा एक भाग म्हणून देण्यात आली आहे.

रिमोट ई-व्होटिंग वेळापत्रक

पात्रतेसाठी कट-ऑफ तारीख	शुक्रवार, ३१ जुलै २०२६
ई-व्होटिंगची सुरुवात	मंगळवार, ११ ऑगस्ट २०२६ (सकाळी ९:०० वाजता भाप्रवे)
ई-व्होटिंगची समाप्ती	बुधवार, ९ सप्टेंबर २०२६ (संध्याकाळी ५:०० वाजता भाप्रवे)

कृपया नोंद घ्यावी की, भागधारकांना संमती किंवा असहमती केवळ दूरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारे नोंदवित येईल. भागधारकांचे मतदानाचे अधिकार कट-ऑफ दिनांकास कंपनीच्या भरलेल्या इक्विटी समभाग भांडवलामध्ये त्यांच्या मालकीच्या समभागांच्या प्रमाणात असतील.

कट-ऑफ दिनांकास जे व्यक्ती कंपनीचे भागधारक नसतील, त्यांनी ही सूचना केवळ माहितीच्या उद्देशाने समजावी. एखाद्या ठराववर एकदा मतदान केल्यानंतर भागधारकांना त्यांचे मतदान नंतर बदलता येणार नाही.

दूरस्थ ई-मतदानाची सुविधा बुधवार, ९ सप्टेंबर २०२६ रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील. त्यानंतर एनएसडीएल द्वारे दूरस्थ ई-मतदान सुविधा निष्क्रिय करण्यात येईल.

कंपनीच्या संचालक मंडळाने दूरस्थ ई-मतदान प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी श्री. मकरंद एम. जोशी (सदस्यत्व क्र.: ५५३३, सराव प्रमाणपत्र क्र.: ३६६२) आणि त्यांच्या अनुपस्थितीत सुश्री. कुमुदिनी भालेराव (सदस्यत्व क्र.: ६६६७, सराव प्रमाणपत्र क्र.: ६६९०), भागीदारांचे, मकरंद एम. जोशी अँड कंपनी, कार्यरत कंपनी सेक्रेटरी, यांची रिमोट ई-व्होटिंगद्वारे पोस्टल बॅलेट निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी स्क्रुटिनायझर म्हणून नियुक्ती केली आहे.

ही सूचना कंपनीच्या www.asianpaints.com या संकेतस्थळांवर, एनएसडीएलच्या www.evoting.nsdl.com या संकेतस्थळांवर तसेच कंपनीचे इक्विटी समभाग सूचीबद्ध असलेल्या शेअर बाजारांच्या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. यामध्ये बीएसई लिमिटेड (बीएसई) www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई) www.nseindia.com यांचा समावेश आहे.

इलेक्ट्रॉनिक स्वरूपात समभाग धारण करणारे आणि ज्यांनी आपला ई-मेल पत्ता किंवा केवायसी तपशील अद्ययावत केलेला नाही, अशा भागधारकांनी संबंधित डिपॉझिटरी सहभागी संस्थेने सुचविलेल्या प्रक्रियेनुसार आपल्या डिमॅट खात्यामध्ये आवश्यक तपशील नोंदवावा किंवा अद्ययावत करावा. भौतिक स्वरूपात समभाग धारण करणारे आणि ज्यांनी आपला ई-मेल पत्ता किंवा केवायसी तपशील अद्ययावत केलेला नाही, अशा भागधारकांनी कंपनीचे नोंदणी व समभाग हस्तांतरण एजंट (आरटीए), एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीचे लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) यांच्याकडे विहित फॉर्म आयएसआर-१ द्वारे सदर तपशील नोंदवावा किंवा अद्ययावत करावा. संबंधित फॉर्म कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत https://www.asianpaints.com/ShareholderServiceRequest.html.

पर्यायी स्वरूपात, टपाल मतपत्रिकेची सूचना प्राप्त होण्यासाठी भागधारक आपला ई-मेल पत्ता तात्पुरत्या स्वरूपात आरटीएकडे नोंदवू शकतात. यासाठी खालील संकेतस्थळाला भेट देऊन सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६ रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी https://web.in.mpms.mufg.com/EmailReg/Email_Register.html.

दूरस्थ ई-मतदानासंदर्भातील तपशीलांसाठी कृपया सूचनेचा संदर्भ घ्यावा. इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानासंदर्भातील कोणत्याही शंकेसाठी भागधारक www.evoting.nsdl.com या संकेतस्थळाच्या डाउनलोड विभागात उपलब्ध असलेले भागधारकांसाठीचे वारंवार विचारले जाणारे प्रश्न ('एफएक्यू') आणि ई-मतदान वापरकर्ता मार्गदर्शिका पाहू शकतात. ई-मतदान सुविधेशी संबंधित कोणतीही शंका, तक्रार किंवा तांत्रिक सहाय्यासाठी खालील दूरध्वनी (०२२) ४८८९ ०००० क्रमांकावर संपर्क साधावा किंवा श्री. अमित विशाल, डिप्युटी वायस प्रेसीडेंट, एनएसडीएल अथवा सुश्री. पल्लवी म्हात्रे, सीनियर मॅनेजर, एनएसडीएल, ट्रेड वर्ल्ड, ए विंग, चौथा मजला, कमला मिल्स कंपाउंड, लोअर परळ, मुंबई – ४०० ०१३ यांच्याकडे evoting@nsdl.co.in या ई-मेल पत्त्यावर विनंती पाठवावी.

ई-मतदानाची छाननी पूर्ण झाल्यानंतर छाननी अधिकारी आपला अहवाल कंपनीच्या अध्यक्षांकडे किंवा अध्यक्षांनी अधिकृत केलेल्या व्यक्तिकडे सादर करतील. मतदानाचा निकाल शुक्रवार, १५ सप्टेंबर २०२६ रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत जाहीर करण्यात येईल. जाहीर करण्यात आलेला निकाल आणि छाननी अधिकाऱ्यांचा अहवाल अध्यक्ष किंवा त्यांनी अधिकृत केलेल्या व्यक्तीने निकाल जाहीर केल्यानंतर तत्काळ कंपनीच्या www.asianpaints.com या संकेतस्थळांवर आणि एनएसडीएलच्या www.evoting.nsdl.com या संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात येईल. निकाल आणि छाननी अधिकाऱ्यांचा अहवाल तत्काळ बीएसई आणि एनएसई यांच्याकडेही पाठविण्यात येईल तसेच कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातील सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल.

एशियन पेंट्स लिमिटेड करिता
स्वाक्षरी/-
आर. जे. जयमुरुगन
सीएफओ व कंपनी सेक्रेटरी

ठिकाण : मुंबई
दिनांक : १० ऑगस्ट २०२६